४-१०.

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**परिपत्रक २०२०-२१**

क्रमांक:प्रले/एफडीटी/13 दिनांक: 20/04/20

**विषय :** नगरसेवक निधीमधून कोविड-१९ च्या उपाययोजनांकरीता रु.१० लाखपर्यंतचा खर्च करण्याबाबत

---

राज्य शासनाने Epidemic Disease Act 1897 अंतर्गत तसेच Prevention of Spread of Dangerous Disease Act under MMC Act 1888 अंतर्गत कोरोना व्हायरस मुंबई शहरामध्ये Epidemic म्हणून घोषित केला आहे. देशामध्ये तसेच मुंबई शहरामध्ये कोविड-१९ या रोगाचा प्रादुर्भाव झालेला आहे. सद्यस्थितीमध्ये मुंबईमध्ये कोरोना बाधित रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. या कोरोना विषाणूने थैमान घातले असून त्यामध्ये उद्भवलेली परिस्थिती अधिकाधीक चिंतेची बाब बनली आहे. मुंबई शहरामध्ये रुग्णांची वाढणारी संख्या लक्षात घेता सद्यस्थितीत आरोग्य विभागास उपलब्ध झालेली तरतूदीचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे.

कोरोनाचे संकट लक्षात घेता सर्व नगरसेवकांकडून त्यांच्या प्रभागातील नागरीकांना कोरोना रोगापासून सूरक्षा व कोरोना नियंत्रित करुन त्यावर उपाययोजना करण्याकरीता तातडीने नगरसेवक निधी वापरण्याकरीता परवानगी द्यावी अशी मागणी करण्यात येत आहे.

कोविड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्याकरीता व त्यावर उपाययोजना करण्याकरीता नगरसेवकांनी नगरसेवक निधीतून खाली नमूद केलेली कामे करण्याची इच्छा दर्शवली असेल तर अश्यावेळी नगरसेवक निधीमधून रु.१० लाखापर्यंत खर्च करण्याची मान्यता देण्यात येत आहे.

१. रुग्णांसाठी मोठया प्रमाणावर अलगीकरण व्यवस्था तयार करणे. त्यामध्ये बेड्स लॉकर्सची सुविधा करणे.

२. कोविड-१९ अंतर्गत काम करणाऱ्या महानगरपालिका कर्मचाऱ्यांना स्वसंरक्षणार्थ पीपीई किट, एन-९५ मास्क, ग्लोव्हज, सॅनिटायझर, डिसइन्फेक्टेड पावडर यासारखे मटेरीयल घेणे.

३. महानगरपालिकेच्या रुग्णालयांत मिनी ऑक्सिजन सिलेंडर, डिजीटल थर्मल स्कॅनर, स्टेटस कोप, ग्लुकोमिटर पल्स ऑक्सिमिटर फींगर यासारखे साहित्य घेणे.

४. सार्वजनिक शौचालये, दवाखाने, मॅटरनिटी होम, महानगरपालिका चौक्यांमध्ये वॉकथ्रू सॅनिटायझरची उभारणी करणे.



Scanned with CamScanner

सदर खरेदी ही मध्यवर्ती खरेदी खात्यामार्फत निर्गमित केलेल्या दरपत्रिकेनुसार करणे आवश्यक असून यावर कार्यकारी आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत नियंत्रण ठेवण्यात येईल.

सर्व खातेप्रमुख व सहाय्यक आयुक्त यांनी याची नोंद घ्यावी व महाराष्ट्र शासनाच्या याबाबतच्या मार्गदर्शक तत्वांस आधिन राहून कार्यवाही करावी.

प्रमुख लेखापाल (वित्त) प्र.

उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य)

मान.अतिरिक्त आयुक्त (प.उप.)

अतिरिक्त आयुक्त (प्रकल्प)

महानगरपालिका आयुक्त

REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA

Scanned with CamScanner